N.C.R.B (एन.सी.आर.बी)
I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)

पोलीस स्टेशन अहेरी जि. गडचिरोली

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** गडचिरोली
**P.S.(ठाणे):** अहेरी
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0368
**Year (वर्ष):** 2026
**Date and Time of FIR (प्र. ख. दिंनाक आणि वेळ):**15/10/2026 23:30

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिंनाक पासून):** 15/10/2026
**Date To ( दिंनाक पर्यंत):** 15/10/2026
**Time From (वेळेपासून):** 11:31 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 13:20 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिंनाक ):** 15/10/2026
**Time (वेळ):** 23:04 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 046
**Date & Time (दिंनाक आणि वेळ):** 15/10/2026 23:04 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पश्चिम, 01 किमी
**Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** श्री रामकष्णा ट्रेडर्स मुख्य, चौक बस स्टँड रोड अहेरी,अहेरी

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** पोनि -अरविंद पुडलिंक राउत

(b) **Father's Name (वडील चे नाव) :** पुडलिंक राउत

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1986

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | ला प्र वी गोंदिया, ,गोंदिया, ,राम नगर,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | ला प्र वी गोंदिया, ,गोंदिया, ,राम नगर,गोंदिया,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):** नोकरी

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8275298475

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | अमोल विलाशराव गुडेलीवार | | वडील का नाम : विलाशराव गुडेलीवार | 1. प्रभाग क्र 9 राजे विश्वेशराव, महाराज चौक ,अहेरी,अहेरी, गडचिरोली,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | मेमोरी कार्ड/फ़्लेश मेमोरी कार्ड | 03 सॅनडिक्स कंपनीचे 32GB क्षमतेचे मेमरीकार्ड | 0.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 2 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | मोबाईल फोन | मोटोरोला EDGE कंपनीचे मोबाईल फोन | 10,000.00 |
| 3 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500रु दराचे 240 भारतीय चलनी नोटा | 120,000.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):

130,000.00

11. **Inquest Report / U.D. case No., if any**
(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents** (प्रथम खबर हकीकत ):

फिंयाद

दिंनाकः- 15.10.2026
लाचलुचपत प्रतिंबधक विभाग गोंदिया
कॅम्प पोलीस स्टेषन अहेरी जि. गडचिरोली.

नांवः- अरविंद पुंडलिक राउत, पोलीस निरीक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग गोंदिया मो. क्र. 8275298475.

आम्ही शासनातर्फे फिंयाद देतो की, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग, गोंदिया येथे पोलीस निरीक्षक या पदावर कार्यरत आहोत. दिंनाक 14.10.2026 रोजी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग गोंदिया कार्यालयात हजर राहुन कार्यालयीन कामे करीत असतांना वेळ 15.30 वा. सुमारास मा. पोलीस उपअधिक्षक श्री. निलेष लोधी यांनी त्यांचे दालनात बोलावुन सांगीतले की, थोडया वेळापुर्वीच लाचलुचपत प्रतिंबधक विभाग गोंदियाचे कार्यालयीन दुरध्वनीवर श्री. सुरज सुरेष येनगटींवार रा. अहेरी यांचा फोन आला असुन त्यांनी ते इलेक्ट्रीक ठेकेदार असुन अहेरी येथे नगरोत्थान योजने अंतर्गत अतिरीक्त सर्व्हिस केबल टाकण्याचे ठेक्याचे काम केलेले आहे व त्याचे संपुर्ण बिल मला मिळालेले आहे. बिल मिंळाल्यानतर नगरपंचायत अहेरी येथील नगरसेवक श्री अमोल गुडेलिवार हे त्यांना सांगत आहेत की, सदरील काम हे जिल्हा नियोजन समीती मधुन मी मंजुर करुन आणलेले असल्याने तुम्हाला त्या कामाचे मोबदल्यात जे बिल मिळालेले आहे त्यापैकी 15 टक्के प्रमाणे रक्कम एकुन 3 लाख रुपये मला दया असे सांगुन मला लाचेची मागणी करीत होते त्यामुळे मी नाईलाजाने त्यांना यापुर्वी 30 हजार रुपये रोखीने दिलेले आहेत. परंतु ते मला वारंवार व्हॉटसअप कॉल करुन 2,70,000 रुपये ची मागणी करीत असल्यामुळे मी मा. पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिंबध विभाग नागपुर यांना नागपुर येथील कार्यालयात जावुन भेटलो होतो तेव्हा मा.पोलीस अधिक्षक यांनी त्यांना गै.अ नगरसेवक श्री अमोल गुडेलिवार हे जेव्हा केव्हा लाचेची मागणी करतील तेव्हा तुम्ही लाचलुचपत प्रतिंबधक विभाग गोंदिया येथील पोलीस उपअधिक्षक श्री निलेष लोधी यांचेषी संपर्क करा तसेच मी सुध्दा त्यांना तुमच्या तक्रारीबाबत बोलतो असे सांगीतले होते दिंनाक 14/10/2026 रोजी मी मजुरांसोबत महागाव रोडवर पुलाजवळ सिमेंट पोल उचलण्याचे काम करीत असतांना, मला भेटुन पुन्हा 2,70,000/- रूपयाची मागणी केली असल्याने मी आज रोजी तुम्हाला फोन केला आहे. तरी त्यांचे विरुध्द कारवाही करावी असे सांगीतल्याचे सांगीतले. तक्रारदार यांचे तक्रारीसंबंधाने मा. पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिंबधक विभाग नागपुर यांना फोनद्वारे माहिती दिली असता त्यांनी सदर तक्रारीवर आपण आपले पथकासह अहेरी, जि.गडचिरोली येथे दिंनाक 15.10.2026 रोजी जावुन तक्रारदार यांचेषी संपर्क साधुन त्यांचे तक्रारीनुसार पुढील कायदेषीर कारवाही करावी असे तोंडी आदेषित केले आहे. मा. पोलीस अधिक्षक यांचे आदेषाप्रमाणे अहेरी, जि.गडचिरोली येथे जावुन कारवाही करणे आहे, त्या कारवाहीमध्ये सापळा अधिकारी म्हणुन आपण कर्तव्य बजवावे, सदर कारवाहीबाबत सापळा पथक,

सापळा कारवाहीसाठी लागणारे आवष्यक संपुर्ण साहीत्य, दोन शासकीय पंच तसेच एक खाजगी वाहन उपलब्ध करुन घ्यावे असे आदेषित करुन गोंदिया ते अहेरी खुप लांब अंतर असल्याने आपण सर्व दिनाक 15.10.2026 रोजी पहाटे 03.00 वा. गोंदिया वरुन अहेरी येथे जाण्यासाठी रवाना होवु असे सांगीतले.
आम्हास आदेषित केल्याप्रमाणे अपर तहसिलदार, तहसिल कार्यालय गोंदिया यांना या कार्यालयाचे पत्र क्र.1106 दिनाक 14.10.2026 व तहसिलदार, तहसिल कार्यालय गोंदिया यांना या कार्यालयाचे पत्र क्र. 1107 दिनाक 14.10.2026 अन्वये पत्र देवुन श्री गुलाम सरवर फारुख खान महसुल सहायक, वित्त विभाग अपर तहसिल कार्यालय गोंदिया व श्री निकेष केषोराव चव्हान, ग्राम महसुल अधिकारी तेढवा, ता.जि.गोंदिया असे दोन शासकीस पंच उपलबध करुन घेतले.
त्यानंतर तक्रारदाराचे तक्रारीवर पुढील कार्यवाही करण्याकरीता कार्यालयातील अंमलदारांचे सापळा पथक तयार करुन सापळा पथकाचा नमुद दोन्ही पंचाषी ओळख करुन दिली तसेच सापळा कार्यवाहीसाठी एक खाजगी चार चाकी वाहन उपलब्ध करुन घेतले. नमुद दोन्ही पंचांना मौजा अहेरी ता.गडचिरोली येथील तक्रारदाराची एका लोकसेवकाविरूध्द लाच मागणी संबंधात तक्रार असुन मौजा अहेरी जि.गडचिरोली येथे जावुन त्यांची तक्रार नोंदवुन तक्रारीनुसार लाच मागणी पडताळणी करुन सापळा कार्यवाही करून पुढील कायदेशीर कार्यवाही करावयाची आहे. सदर कार्यवाहीत पंच म्हणुन काम करण्याची त्यांची संमती विचारली असता त्यांनी स्वखुषीने पंच म्हणुन काम करण्याची संमती दिली. त्यावरुन मौजा अहेरी जि.गडचिरोली येथील दिसुन येणारी परिस्थीती व वस्तुस्थिती लक्षात घेवुन त्यानुसार उपलब्ध असलेल्या पंचापैकी पंच क्र. 1 व पंच क्र. 2 म्हणुन ठरविण्याचे ठरवुन सापळा पथकातील सर्व अंमलदार, दोन्ही पंच तसेच खाजगी वाहनाचे चालक श्री मंगेष ठाकरे यांना दिनाक 15.10.2026 रोजी पहाटे 03.00 वा. लाचलुचपत प्रतिंबधक विभाग गोंदिया येथे न चुकता हजर राहण्याची सुचना दिली होती.

दिंनाक 15.10.2026 रोजी दोन्ही पंच, खाजगी वाहन चालक त्यांचे वाहनासह, सापळा पथक कार्यालयात वेळेवर हजर आले. मा.पोलीस उपअधीक्षक श्री निलेष लोधी यांनी सापळा पथकास अहेरी येथे जावुन करण्यात येणा-या कारवाहीबाबत थोडक्यात समजावुन प्रवासादरम्यान याबाबत गोपनियता राखण्याची सुचना देवुन मार्गदर्षन केले.

त्यानंतर आम्ही सर्व सापळा पथक सापळा कार्यवाहीसाठी लागणारे आवष्यक सर्व साहीत्य सोबत घेवुन शासकीय वाहन क्र.एम.एच.35/अॅडब्लु-0486 व खाजगी वाहन क्र.एम.एच.33/अॅडी-2926 ने गोंदिया येथुन अहेरी येथे जाण्यासाठी वेळ 03.30 वा. रवाना झालो. प्रवासादरम्यान आम्ही आमचे मोबाईल क्र.8275298475 वरुन तक्रारदार श्री सुरज सुरेष येनगंटीवार यांचे मोबाईल क्र.9834756128 वर संपर्क केला असता त्यांनी ते अहेरी जवळ महागाव फाटयाजवळ हजर असुन अहेरी जवळ पोहचल्यावर कॉल करा मी तुम्हास भेटतो असे सांगीतले. अहेरी गावाचे पुर्वी महागाव फाटयाजवळ पोहचल्यावर तक्रारदार यांचे मोबाईलवर संपर्क केला असता त्यांनी तिथेच थांबा मी येतो असे सांगीतले आम्ही तिथे थोडा वेळ थांबुन राहीलो. थोडया वेळातच एक ईसम त्यांचे मोटारसायकलने आमचे वाहनाजवळ आल्यावर पर्यवेक्षन अधिकारी मा.निलेष लोधी, पोलीस उपअधिक्षक यांनी आलेले ईसम हे तक्रारदार असल्याचे आम्हास सांगीतले. तक्रारदार यांना कारवाहीसाठी जवळपास सुरक्षित स्थान कोठे आहे म्हणुन विचारले असता त्यांनी ग्राम वांगेपल्ली जवळील प्राणहिता नदीकाठचे ठिकाण आहे असे सांगीतल्याने आम्ही सर्वजन तक्रारदार यांचेसह वांगे पल्ली जवळील प्राणहिता नदीकाठी वेळ 09.30 वा. पोहचलो व ते ठिकाण कारवाहीसाठी सुरक्षित दिसुन आल्याने तिथुनच पुढील कार्यवाही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यानंतर सोबत आणलेली दरी खाली आंथरुन त्यावर बसुन तक्रारदार यांची सापळा पथक व दोन्ही पंच यांचेषी ओळख करुन दिल्यानतर श्री. निकेष केषोराव चव्हान यांना पंच क्र.1 तर श्री गुलाम सरवर फारुख यांना पंच क्र.2 म्हणुन ठरविण्यात आले. त्यानंतर तक्रारदार यांना त्यांचे तक्रारीसंबंधाने विचारपुस केली असता त्यांनी ते इलेक्ट्रीक ठेकेदार असुन अहेरी येथे नगरोत्थान योजने अंर्तगत अतिरिक्त सर्व्हिस केबल टाकण्याचे ठेक्याचे काम केलेले आहे व त्याचे संपुर्ण बिल त्यांना मिळालेले आहे. बिल मिंळाल्यानतर नगरपंचायत अहेरी येथील नगरसेवक श्री अमोल गुडेलिवार हे त्यांना सदरील काम हे जिल्हा नियोजन समीती मधुन मी मंजुर करुन आणलेले असल्याने तुम्हाला त्या कामाचे मोबदल्यात जे बिल मिळालेले आहे त्यापैकी 15 टक्के प्रमाणे रक्कम एकुन 3 लाख रुपये मला दया असे सांगुन मला लाचेची मागणी करीत होते त्यामुळे मी नाईलाजाने त्यांना यापुर्वी 30 हजार रुपये रोखीने दिलेले आहेत. परंतु ते मला वारंवार व्हॉटसअप कॉल करुन 2,70,000 रुपये ची मागणी करीत आहेत व त्यांना मला लाच देण्याची ईच्छा नाही असे सांगुन त्यांनी लिहुन आणलेली तक्रार आम्हास दिली. सदरची लेखी तक्रार आम्ही व पंचांनी वाचली असता तक्रारदार यांनी कथन केलेली तक्रार व आम्हास दिलेल्या लेखी तक्रारीतील मजकुर सारखाच असल्याची आमची व पंचाची खात्री झाल्याने आमचे सुचनेवरुन त्या तक्रारीवर दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली त्यानंतर आम्ही स्वाक्षरी केली. तक्रारदार यांनी सादर केलेली लेखी तक्रार खालीलप्रमाणे आहे.

लेखी तक्रार

दिंनाकः-15/10/2026

प्रति,
मा. पोलीस उपअधिक्षक
लाचलुचपत प्रतिंबधक विभाग गोंदिया.

विषयः- गैरअर्जदार श्री अमोल गुडेलीवार, पद स्वीकृत नगरसेवक नगरपंचायत अहेरी, हे मला मिळालेल्या कामाचा मोबदला म्हणुन 2,70,000/- रूपये मागत असल्याने त्यांच्यावर कायदेषीर कारवाई होण्याबाबत...

तक्रारदारः- श्री सुरज सुरेष येनगटींवार, वय 33 वर्ष, व्यवसाय- ईलेक्ट्रीकल ठेकेदार, रा. वार्ड नं. 2, पावर हाऊस जवळ अहेरी, ता. अहेरी, जि. गडचिरोली. मो. क्र. 9834756128

महोदय,

सविनय सादर की, मी वर नमुद ठिकाणी माझ्या परिवारासह राहत असुन मी ईलेक्ट्रीकल ठेकेदारीचे काम करतो. माझे YENGHANTIWAR ELECTRICAL AND SERVICES या नावाची ठेकेदारी फर्म आहे. तसेच उपजिल्हा रूग्णालय अहेरी समोर क्रिषीका ईलेक्ट्रीकल नावाचे ईलेक्ट्रीक दुकान आहे. सदरचे दुकान मी स्वतः पाहतो. माझे ठेकेदारीचा परवाना क्रमांक 4403100044 असा आहे. G K HITECH SERVICES, BHENDALA नावाने माझा मित्र गौरव कलंत्री यांची ठेकेदारीची फर्म आहे. त्या फर्मला नगरोत्थान योजना (जिल्हास्तर)सन 2025-2026 मध्ये मौजा अहेरी येथे प्रभाग क्रमांक 1 ते 10 मध्ये मंजुर निविदा रक्कम 993909/-रूपये व प्रभाग क्रमांक 11 ते 17 मध्ये मंजुर निविदा रक्कम 993856/- रूपये असे एकुण 19,87,765/- रूपयाचे अतिरीक्त सर्व्हिस केबल टाकण्याचे काम मिळाले होते. माझा मित्र गौरव कलंत्री यांच्याकडुन प्रभाग क्रमांक 11 ते 17 चे काम करारनामा करून मी पुर्ण केला आहे. गौरव कलंत्री हा माझा मित्र असल्याने माइया कामासोबत प्रभाग क्रमांक 1 ते 10 च्या कामावर मी देखरेख ठेवुन तो काम पुर्ण केला होता. मला मिळालेल्या कामानुसार दोन्ही कामांचे कार्यरंभ आदेष मिळाल्या दिंनाक 29/01/2026 रोजी पासुन विहीत मुदत, 180 दिवसात पुर्ण करण्यात आले आहेत. सदर दोन्ही कामाचे संर्पुण बिल निघाले असुन, प्रभाग क्रमांक 1 ते 10 व प्रभाग 11 ते 17 ची अमानत रक्कम अनुक्रमे 68,841 व 68,570/-रूपये असे मिळुन एकुन 1,37,411/- रूपये मिळणे बाकी आहे. सन 2022 सार्वत्रिक निवडणुकांमध्ये नगरपंचायत अहेरी येथे, 01 नगराध्यक्ष, 01 उपनगराध्यक्ष, 15 नगरसेवक व 2 स्वीकृत नगरसेवक असे एकुण 19 ची बॉडी बसली आहे. 02 स्वीकृत नगरसेवकांमध्ये श्री अमोल गुडेलीवार, रा. अहेरी, मो.नं. 9021185900 हे एक असुन त्यांनी नगरोत्थान योजना (जिल्हास्तर)सन 2025-2026 चे बिल निघण्यास दिंनाक 07/07/2026 पासुन सुरूवात झाल्यानंतर माइया दुकानामध्ये येवुन तसेच दिंनाक 17/09/2026 रोजी नगरपंचायत अहेरी येथे भेटुन बोलु लागले की, ‘अहेरी येथे नगरोत्थान योजनेचे कामे जिल्हा नियोजन समिती गडचिरोली येथुन मी स्वतः आणली आहेत. ते आमच्या कोटयातील आहेत.’ त्यामुळे तु केलेल्या 19,87,765/- रूपयाच्या कामाचे मोबादला 15 टक्के प्रमाणे सरासरी 3,00,000/- रूपये मला दे अषी वारंवार मागणी करून इतर कामात अडवणुक करीत होता. नाईलाज म्हणुन दिंनाक 5/8/2026 रोजी नगदी 30,000/- रूपये दिले होते. तरीपण त्याचे वारंवार व्हॉटअॅपवर फोन करून उर्वरीत 2,70,000/-रूपये करीता फोन येत होते. म्हणुन मी लाचलुचपत प्रतिंबधक विभाग नागपूर येथे मा. पोलीस अधिक्षक सा. यांची भेट घेवून आपली तक्रार सांगितली. तेव्हा माझी तक्रार ऐकुण आपणाकडे गैरअर्जदार याने लाचेची मागणी केल्यास आपण गोंदिया येथील लाचलुचपत कार्यालयाषी संर्पक करावे असे सांगितले होते. दिंनाक 14/10/2026 रोजी मी मजुरांसोबत महागाव रोडवर पुलाजवळ सिमेंट पोल उचलण्याचे काम करीत असतांना, मला भेटुन पुन्हा 2,70,000/- रूपयाची मागणी केली.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

HARSHAL VINAYAKRAO EKRE(I (Inspector)) / PORN151010000402HVEM8501L **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.** (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):

**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

**Registered by** (नोंदणी अधिकारी)

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name (नाव):** HARSHAL VINAYAKR
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN15101000402HVE

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

ठाणे अंमलदार
पोलीस स्टेशन, अहेरी

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)